# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०३ जुलै, २०२४ / आषाढ १२, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अल्पसंख्यांक विकास, औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(७)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

### कात्रज ते राजस सोसायटी (पुणे) येथील उड्डाणपुलाच्या प्रलंबित कामाबाबत

**(१) * ८०३९० श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील कात्रज येथील वंडर सिटी ते राजस सोसायटी चौकापर्यंत सुरू असलेल्या उड्डाणपुलाचे काम अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरिता कोटयवधी रुपयांचा खर्च करण्यात आला असून याकरिता असलेली मुदत माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान संपुष्टात आली असतानाही अद्याप उड्डाणपुलाचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर उड्डाणपुलाचे काम प्रलंबित राहिल्यामुळे कात्रज-कोंढवा रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी व अपघात होत असून प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर उड्डाणपुलाचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत काय कार्यवाही केली, तसेच या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

आजमितीला उड्डाणपुलाचे ४० टक्के काम पूर्ण झालेले आहे. तसेच स्लीप रोडचे काम पूर्ण झालेले असून सेवा रस्त्याचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे. विद्युत वाहिन्या स्थलांतरीत करणे व कल्व्हर्ट रुंदीकरणाचे काम पुणे महानगरपालिकेच्या मल:निस्सारण पाईपच्या कामामुळे प्रलंबित आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत कात्रज चौक ते राजस सोसायटी पर्यंतच्या उड्डाणपुलाचे काम प्रगतीत असून स्लीप रोड व सेवा रस्त्यांचे काम पुणे महानगरपालिकेमार्फत प्रगतीत आहे. पुणे महानगरपालिकेकडून जागा हस्तांतरीत न होणे, महानगरपालिकेच्या दवाखान्याचे अतिक्रमण काढण्यास पुणे महानगरपालिकेकडून झालेला विलंब, कात्रज चौकातील वाहतूक व पुलाच्या बांधकामासाठी लागणारे मोठया आकाराचे गर्डर विचारात घेऊन वाहतूक सुरक्षिततेच्या

दृष्टीने पुलाचे काम रात्रीच्या वेळेमध्ये करणे सोयीचे असणे, या बाबींमुळे काम पूर्ण करण्यास विलंब होत आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

कात्रज चौकातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलीस विभाग ट्राफीक वॉर्डन यांचे मदतीने वाहतुक सुरळीत ठेवण्यात येत आहे.

(४) व (५) सदर कामास माहे जानेवारी, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून त्यानुसार उर्वरीत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्या न्यू गर्ल्स वसतिगृहात मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२) * ८१५९३ श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील न्यू गर्ल्स वसतिगृहामध्ये मोठया प्रमाणात सुविधांचा अभाव असल्याने तेथील विद्यार्थिनींची प्रचंड गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसतिगृहात भोजन कक्ष, आरोग्य सुविधा व स्वच्छ पाण्याचा अभाव, पुरेशी सुरक्षा व्यवस्था नसणे, आदि महत्त्वाच्या मूलभूत सोयी उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू वसतिगृहात दूषित पाणी पिऊन विद्यार्थिनींना उलटीच्या त्रासाला सामोरे जावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थिनींना सर्व मूलभूत सोयी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.
(४) मुंबई विद्यापीठाच्या नव्याने सुरु झालेल्या न्यु गर्ल्स वसतिगृहातील विद्यार्थीनी दि.१८.०४.२०२४ रोजी वसतिगृहाच्या व्हॉटस्ॲप ग्रुपवर त्यांना उलट्या, जुलाब, पोटदुखीचा त्रास होत असल्याचा मेसेज टाकला होता. त्यानुषंगाने वसतिगृह प्रशासनाने प्रत्येक मुलीची वैयक्तिक भेट घेऊन विचारपूस केली असता गेल्या ४ दिवसांपासून त्यांना घामोळया येणे, तोंड येणे, पित्त, ताप, युरीन इन्फेक्शन, उलट्या, जुलाब, पोटदुखी चा त्रास वातावरणातील बदलामुळे व अति उष्णतेमुळे होत असल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थीनींना गरजेनुसार विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामधून उपचार करुन घेतले आहेत.

दि.२२ एप्रिल, २०२४ रोजी वसतिगृहातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाण्याच्या पाईप लाईन मधून येणारे पाणी दूषित येत असल्याचे निदर्शनास आल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांनी वसतिगृहाच्या टाकीत पडणारे पाणी बंद केले. दरम्यान विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत केंद्रावरुन पाण्याच्या टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. दि.०६ मे, २०२४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या पिण्यायोग्य पाणी तपासणी अहवालानंतर शुध्द पाण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करुन महानगरपालिकेने पाण्याचा पुरवठा पुर्ववत सुरु केला आहे.

विद्यापीठाच्या वसतिगृहात पिण्याच्या पाण्यासाठी तीन प्युरीफायर बसविलेले होते व नव्याने ४ प्युरिफायर बसविण्यात आले आहेत. दूषित पाण्यामुळे विद्यार्थीनींना उलटीच्या त्रासाला सामोरे जावे लागल्याची बाब वसतिगृह प्रशासनाच्या निदर्शनास आली नाही.

वसतिगृह नव्यानेच सुरु झाले असल्यामुळे मेससाठी ई-टेंडर मागविण्याची प्रक्रिया विद्यापीठाकडून सुरु आहे, विद्यापीठात आरोग्य केंद्र आहे, वसतिगृहासाठी प्रत्येक शिफ्टमध्ये दोन महिला सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. वसतिगृहात आवश्यक त्या सोयीसुविधा विद्यापीठाकडून उपलब्ध करुन दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कापूस पिकाला योग्य हमी भाव मिळणेबाबत**

**(३) * ८१२८४ श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२३-२४ मध्ये कापसाला मागील चार वर्षात निचांकी भाव मिळत असल्यामुळे राज्यात विविध जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय कपास निगम (सीसीआय) मार्फत कापूस खरेदी करताना अनेक जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना त्यांचा कापूस खुल्या बाजारात कमी दराने विक्री करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केवळ खरीप ई-पीक नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा कापूस भारतीय कपास निगम (सीसीआय) खरेदी करत असून ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक नोंदणी केली नाही, अशा शेतकऱ्यांचा कापूस भारतीय कपास निगम (सीसीआय) खरेदी करत नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना कवडी मोल भावाने आपल्या उत्पादनाची विक्री करण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात राज्यात विविध जिल्ह्यात भारतीय कपास निगमच्या (सीसीआय) जाचक अटी दूर करणेबाबत तसेच कापसाला वाजवी भाव देणेसह निर्यात धोरण करणेबाबत शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कापसाला वाजवी भाव, जाचक अटी दूर करणे, निर्यात धोरण व अनुदान देणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
मागील चार हंगामात कापसाच्या किमान हमी दरात केंद्र शासनाने वाढ केली असून, कापूस हंगाम सन २०२३-२४ करीता मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु.६६२०/- आणि लांब धाग्याच्या कापसासाठी रु.७०२०/- प्रति क्विंटल इतका किमान हमी दर निश्चित केला आहे. खुल्या बाजारात कापसाचे दर किमान हमी दरापेक्षा जास्त आहेत.
(२) हे खरे नाही.
केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान हमी दराच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाचे भारतीय कपास निगम (सीसीआय) राज्यात कापूस खरेदी करत आहे. सीसीआयने हंगाम २०२३-२४ मध्ये राज्यातील ११० केंद्रावर किमान हमी दराने १२ लक्ष क्विंटल पेक्षा जास्त एफएक्यू (फेअर ॲव्हरेज क्वॉलिटी) प्रतिचा कापूस खरेदी केलेला आहे.
(३) किमान हमी दराचा लाभ खऱ्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या नियमानुसार आधार प्रमाणीत नोंदणी करणे आवश्यक आहे. ई-पीक नोंदणीद्वारे खऱ्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांची खात्री करुन कापूस खरेदी करण्यात येऊन कापसाचे चुकारे शेतकऱ्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यात जमा करण्यात येतात.
(४) व (५) खुल्या बाजारपेठेत कापसाचे दर किमान हमी दरापेक्षा कमी झाल्यास कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान हमी दराने केंद्र शासनाचा मुख्य अभिकर्ता, भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) यांच्याद्वारे व सीसीआयचे उपभिकर्ता (Sub Agent) म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक

पणन महासंघाद्वारे राज्यात किमान हमी दराने कापूस खरेदी करण्यात येते.

केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान हमी दराच्या निकषांनुसार किमान हमी दराने कापूस खरेदी करणे सीसीआय व महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघास बंधनकारक आहे. तसेच कापूस निर्यातीबाबतचे धोरण केंद्र शासनाकडून ठरविले जाते व कापसाला हमी दरा व्यतिरिक्त अनुदान दिले जात नाही. त्यामुळे याबाबत राज्य शासनास प्राप्त झालेली निवेदने सीसीआयकडे पाठविण्यात येतात.

शेतकऱ्यांनी एफएक्यू दर्जाचा कापूस किमान हमी दरापेक्षा कमी दराने विकू नये असे आवाहन सीसीआयने वृत्तपत्रे आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केले आहे.

कापसाची उत्पादकता व गुणवत्ता वाढून त्यास बाजारात चांगला दर मिळण्यासाठी केंद्र शासन व भारतीय कपास निगम राज्य शासनाशी समन्वय साधून विविध उपक्रम राबवित आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिंचवड (जि.पुणे) येथील एल्प्रो इंटरनॅशनल स्कुल या शाळेत तीन वर्षाच्या मुलीला मारहाण करुन शारीरिक शोषण केल्याबाबत

**(४) * ८१००९ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचवड (जि.पुणे) येथील एल्प्रो शाळेत तीन वर्षाच्या मुलीला सहाय्यक कर्मचाऱ्यांनी मारहाण करुन शारीरिक शोषण केल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुलीच्या पालकांनी राष्ट्रीय बाल अधिकार आयोगात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कर्मचारी व शाळा प्रशासनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुलीला सहाय्यक कर्मचाऱ्यांनी किरकोळ मारहाण केल्याचे निर्दशनास आले आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) यासंदर्भात दिनांक १८.०३.२०२४ रोजी एल्प्रो इंटरनॅशनल स्कुल, चिंचवड शाळेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. याबाबत सुनावणी देखील आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस मुख्याध्यापक, एल्प्रो इंटरनॅशनल स्कुल उपस्थित राहून त्यांनी म्हणणे मांडले. तथापि सदर सुनावणीस तक्रारदार विद्यार्थीनीचे पालक (आई) ह्या अनुपस्थित राहिल्या.

मा. राष्ट्रीय बाल हक्क आयोग यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारीबाबत दिनांक २६.०३.२०२४ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे व दिनांक ०४.०४.२०२४ रोजी शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडे ई-मेलद्वारे एल्प्रो शाळेबाबत केलेली तक्रार मागे घेत असलेबाबत तक्रारदार यांनी कळविले आहे. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या परिसरात निकृष्ट दर्जाची विकासकामे करण्यात येत असल्याबाबत

**(५) * ७९६८८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर येथील विकासकामांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून सद्य:स्थितीत या ठिकाणी स्कायवॉकसह, पेईंग वॉर्ड, मुलींचे वसतिगृह आणि सुरक्षा भिंत उभारण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असून त्यावर संबंधित अधिकाऱ्यांचे कोणतेही नियंत्रण व देखरेख नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामामुळे रुग्णालय परिसरात सर्वत्र बांधकाम साहित्य पसरलेले असल्यामुळे रुग्ण व नातेवाईकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुरक्षा भिंतीसाठी खोदण्यात आलेल्या खडयांमुळे लगतच्या वस्तीतील सिवेज लाईन फुटल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून रुग्ण व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामांचा दर्जा सुधारण्याबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी आवश्यकतेप्रमाणे कामास भेटी देत असून सदर बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानकाप्रमाणे करुन घेत आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे

बांधकामे प्रगतीत असल्यामुळे आवश्यक बांधकाम साहित्याचे ढीग आहेत. परंतु सदर बांधकाम साहित्य वर्दळीच्या ठिकाणापासून दूर अंतरावर असल्याने रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत नाही.

(४) सुरक्षा भिंतीसाठी खोदताना सिवेज लाईन फुटली होती. तथापि सदर सिवेज लाईन त्वरित दुरुस्ती करण्यात आली असल्याने दुर्गंधी अथवा नागरिकांचे आरोग्यास कोणताही धोका नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई ते नागपूर या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाची झालेली दुरवस्था

**(६) * ८०४७० श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते नागपूर या समृध्दी महामार्गावर १४ महिन्यांतच नांदगांव-खांडेश्वर तालुक्यातील लोहोगावनजीकच्या पुलाला मोठे भगदाड पडल्याचे दिनांक २ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून पुलाचा स्लॅब कोसळून पुलाच्या मधोमध टाकलेले लोखंडी चॅनल जागोजागी तुटून पडल्याचे देखील माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्गाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून त्यात अनेक त्रुटी असल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात येऊनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या महामार्गावर आजवर अनेक लहान-मोठे अपघात होऊन जिवीतहानी झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्ते व पुलाची दुरुस्ती करणेसह संबंधित दोषी कंत्राटदाराविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) मुंबई ते नागपूर समृध्दी महामार्गावरील नांदगांव – खांडेश्वर तालुक्यातील लोहगांव नजीकच्या पुलाला किरकोळ क्षती झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
समृध्दी महामार्गाचे बांधकाम विहित मानकाप्रमाणे करण्यात आलेले असून बांधकामाचा दर्जा चांगला आहे.
(४) हे खरे नाही.
समृध्दी महामार्गावरील अपघात सदोष बांधकामामुळे झालेले नसून विहीत मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहने चालविणे व वाहतूक शिस्त तसेच वाहतूक नियमांचे पालन न करणे ही अपघातांची प्रमुख कारणे आहेत.
(५) व (६) सदर पुलाची (व्हायाडक्टची) तसेच, या बांधकामपॅकेज अंतर्गत संपूर्ण लांबीतील सर्व पुलांची तपासणी प्राधिकृत अभियंता यांच्याकडून करण्यात आली असून त्यांच्या तपासणी अहवालानुसार सदर पुल (व्हायाडक्ट) व इतर सर्व पुल सुस्थितीत आहेत.

-----------------

## पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(७)** * **७९४६३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावरील हडपसर रविदर्शन पुढील साडेतीन कि.मी अंतरावर सुरु असलेले डीबीएमचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता सुस्थितीत असताना देखील या रस्त्यावर कोटयवधी रुपये खर्च करुन केलेले डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून रस्ता जागोजागी उखडल्याने तेथे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ च्या लांबीमध्ये सुमारे १,२०,००० PCU प्रतिदिन वाहतूक वर्दळ असून अस्तित्वातील रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याने रस्ता दुरुस्तीचे काम रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने मंजूर केले होते.

सदर लांबीतील किमी ८/८०० ते किमी १२/५०० भाग रविदर्शन हडपसर ते मांजरी स्टड फार्म पुणे (लांबी ३.७० किमी) चे रु. २१.०१ कोटी रक्कमेचे काम रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचेकडून माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये मंजूर करण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकल्पामध्ये Profile Correction सह पूर्ण लांबीमध्ये चारपदरी रस्त्यासाठी ८० मीमी

डीबीएम व ५० मीमी बी.सी. करण्याची तरतुद अंतर्भूत आहे.

महामार्गावरील सदर काम चालू असताना डीबीएम च्या पृष्ठभागावरुन मोठ्या प्रमाणावर वाहतूक वर्दळ झाल्याने काही ठिकाणी डीबीएम ची खडी निघून गेल्याचे निदर्शनास आले होते. अशा ठिकाणी सदरचा भाग कंत्राटदाराकडून पुर्ववत करुन त्यावर बी.सी. चे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत किमी १०/५०० ते किमी १२/५०० (२ किमी लांबी) मध्ये ८० मीमी डीबीएम व ५० मीमी बी सी चे काम पूर्ण झाले असून उर्वरित १.७ किमी लांबी मधील काम प्रगतीपथावर आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातामधील मृतांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(८) * ७९७१३ श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातामधील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांच्या मदतीची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी करुनही अद्यापही यासंदर्भात कोणतेही परिपत्रक, आदेश, शासन निर्णय निर्गमित करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणतेही आदेश निर्गमित न केल्याबाबतची माहिती मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सादर केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समृध्दी महामार्ग अपघातातील मृतांना तात्काळ मदत देण्यासंदर्भातील आदेश निर्गमित करणे, प्रवासी थांबे, शौचालये व इतर आवश्यक सोई-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर दिनांक ०१/०७/२०२३ रोजी बुलढाणा जिल्ह्यात झालेल्या अपघातामध्ये एकूण २५ प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. मा. मुख्यमंत्री महोदयांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक विशेष बाब म्हणून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी रुपये पाच लाख याप्रमाणे रुपये एक कोटी पंचवीस लक्ष इतके अर्थसहाय्य मंजूर केलेबाबत मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई यांचेकडून दिनांक २० जुलै, २०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

समृद्धी महामार्गावरील अपघातांच्या अनुषंगाने सहायता रकमेबाबत जनहित याचिका क्रमांक ४५/२०२३ दाखल आहे.
(३) मृतांच्या कुटुंबियांना/वारसांना जिल्हाधिकारी मार्फत मा.पंतप्रधान सहाय्यता निधी अंतर्गत रुपये दोन लक्ष प्रमाणे मृतांच्या कुटुंबियांना/वारसांना तसेच मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत प्रत्येकी रुपये पाच लक्ष प्रमाणे वाटप करण्यात आले आहे, असे बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे. तसेच समृद्धी महामार्गावर एकूण १६ इंधन स्थानके कार्यरत असून याठिकाणी इंधन, पाणी, स्वच्छतागृहे या प्रकारची सोय करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) शहरात तसेच शहरालगतच्या महामार्गावर भेसळयुक्त व विनापरवाना निरा विक्री होत असल्याबाबत

**(९) * ७९५८३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) शहरात तसेच शहरालगतच्या महामार्गावर शेकडो निरा विक्री केंद्र विनापरवाना व भेसळयुक्त निरा विक्री करीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निरा विक्री केंद्रातून विशिष्ट प्रक्रिया करून सायक्रीन, चुना व बर्फ टाकून भेसळयुक्त निरा विक्री होत असतांनाही याकडे शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निरा विक्री केंद्रातून भेसळयुक्त निरा प्राशन केल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून अनेकांना पोटांचे व किडणीचे विकार सुरू झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर भेसळयुक्त निरा विक्री केंद्र बंद करुन याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अशा प्रकारची तक्रार अन्न व औषध प्रशासनाच्या रायगड कार्यालयास प्राप्त नाही.

(४) पनवेल (जि.रायगड) शहरात तसेच शहराच्या महामार्गावर ग्राहकांना विक्री करण्यात येणाऱ्या निरा या अन्नपदार्थाचा अन्न व औषध प्रशासन रायगड कार्यालयाच्या अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी केली असता, पनवेल तालुक्यातील खारघर शहरालगतच्या महामार्गावर १ नीरा विक्री केंद्र सदर अन्न पदार्थाची विक्री करीत असल्याचे आढळून आले. सदर निरा विक्री आस्थापनेची तपासणी केली असता, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, रायगड यांनी दि. ३०.०६.२०१७ पर्यंत निरा विक्री करण्याकरीता देण्यात आलेला परवाना आढळून आला. परंतु, सदर आस्थापनेकडे अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र आढळून आले नाही. त्यामुळे संबंधितांविरुद्ध अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ चे कलम ६९ नुसार तडजोड अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच, निरा या अन्न पदार्थाचा एक नमुना विश्लेषणासाठी घेतला आहे. सदर अन्न पदार्थांचा विश्लेषण अहवाल प्राप्त होताच विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील तरतूदीनुसार नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात होत असलेल्या दुधातील भेसळीचे प्रमाण रोखण्याबाबत

**(१०) * ७९४२१ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठया प्रमाणात दुधात भेसळीचे प्रमाण वाढत असून अनेक ठिकाणी विभागाकडून टाकलेल्या धाडीत भेसळयुक्त दूध तसेच दुग्धजन्य पदार्थांची विक्री होत असल्याचे निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात मालवणी, मालाड पश्चिम, मार्वे रोड परिसरात दूध संकलन केंद्रामध्ये कॉस्टिक सोडा मिल्की लिस्ट या रासायनिक पावडरच्या मिश्रणातून बनावट दूध बनविले जात असल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भेसळयुक्त दुधामुळे नागरीकांना कॅन्सर, किडनी रोग, हृदयविकार सारख्या विविध आजारांची लागण होत असून बालकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे निर्दशनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुध भेसळीचे प्रकार रोखण्याबाबत तसेच संबंधित विक्रेते व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) (२) व (३) हे खरे नाही.
(४) दूध भेसळीवर आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत दूध भेसळ करणाऱ्यांवर पाळत ठेवून किरकोळ विक्रेत्यांपासून ते उत्पादकांपर्यंत सर्व दूध व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांच्या तपासण्या करून विश्लेषणासाठी नमुने घेण्यात येतात व अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत तरतुदींचे उल्लंघन आढळून आलेल्या प्रकरणी सदर कायद्यातील तरतुदी नुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

तसेच, मुंबई व ठाणे शहरामध्ये दुधाच्या पिशव्या टेम्परिंग करून होणाऱ्या भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी झोपडपट्टी मोहीम राबवून संबंधित व्यक्ती विरुद्ध गुन्हे नोंदविले जातात.

तसेच, मुंबई व ठाणे शहरामध्ये येणारे दूध मानकाप्रमाणे आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी नाका मोहीम राबविण्यात येते. सदर नाका मोहिमेत दुधाची चाचणी त्याच ठिकाणी करून दूध कमी दर्जाचे आढळल्यास ते आलेल्या ठिकाणाकडे परत पाठविण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यांचे कॉंक्रिटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याबाबत

**(११) * ८१७०३ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील महानगरपालिका क्षेत्रात विविध रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचे काम मोठया प्रमाणात सुरु असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे काम कोणतेही नियोजन न करता व निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असून कामतघर ते तडाली आणि वरलादेवी चौक ते कामतघर तडाली, मानसरोवर तसेच फेनरोड वरील पूर्ण रस्त्याचे खोदकाम नियोजित व विकास योजनेच्या अनुषंगाने होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील रस्त्यांच्या अनियोजनबध्द कामांमुळे मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांचे काम दर्जेदार व कालबध्द पध्दतीने करणेबाबत तसेच यातील दोषी कंत्राटदाराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदरचे काम उपलब्ध असलेल्या रुंदीमध्ये करारनाम्याच्या तरतूदीनुसार व विनिर्दिष्ट मानकानुसार करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

सदर रस्त्यावर वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घेऊन काँक्रिटीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिका हद्दीत आरटीई मान्यतेविना २१८ खाजगी विनाअनुदानित शाळा सुरु असल्याबाबत

**(१२) * ८०१८३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायदा, २००९ नुसार प्रत्येक शाळेला दर तीन वर्षांनी आरटीई ची मान्यता घेणे अनिवार्य असून यात शाळेच्या इमारतींची स्थिती,विद्यार्थ्यांसाठी पुरेशी शौचालय सुविधा, आग प्रतिबंधक यंत्रणा व विद्यार्थ्यांची पटसंख्याची तपासणी करुन शाळेला मान्यता दिली जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आरटीई मान्यतेविना २१८ खाजगी विनाअनुदानित शाळा सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शासन मान्यता न घेता नियमांचे उल्लंघन करुन मुंबईत २१० अनधिकृत शाळा सुरु असल्याचे शिक्षण विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणातून माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित शाळांची तपासणी करुन शाळांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव तात्काळ पाठविण्याचे आदेश शिक्षण मंडळाचे संचालक यांनी शिक्षण उपसंचालक, मुंबई यांना माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई विभागीय उपसंचालनालयाने संचालकांना माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान सादर केलेल्या अहवालात शाळांविरुध्द कारवाई करण्याचे सर्व अधिकार शिक्षणाधिकारी यांचेकडे असल्याने अद्याप त्यांच्यावर कारवाई केली नसल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त सर्व शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११ (४) मधील तरतुदीनुसार आरटीई मान्यता प्रमाणपत्र (नमुना-२) संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करणे बंधनकारक आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी अनुदानित व विनाअनुदानित २१८ शाळांपैकी १९२ शाळांना आरटीई ची मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित २६ शाळांपैकी ७ शाळा बंद झालेल्या असून १९ शाळांना आरटीईची पुर्नमान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील काँक्रिटीकरणाच्या कामादरम्यान झालेले भीषण अपघात**

**(१३) * ८१७०६ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील काँक्रिटीकरणाच्या कामादरम्यान ठेकेदाराने सुरक्षितता उपाययोजनांची अंमलबजावणी न केल्याने उक्त महामार्गावर माहे जानेवारी ते मार्च २०२४ या कालावधीत १०७ अपघात झाले असून त्यात ५८ जणांचा मृत्यू तर ४१ जण जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर महामार्गावरील चिंचोटी येथे दिनांक ३ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास इनोव्हा गाडीला भीषण अपघात होऊन अनेक जण मृत व जखमी झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महामार्गावरील अपघात टाळण्याबाबत कार्यवाही करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर महामार्ग हा केंद्रशासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. गृहविभागाच्या अहवालानुसार मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर माहे जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ या कालावधी मध्ये एकूण १६१ अपघात झाल्याची नोंद असून त्यामध्ये एकूण ९३ व्यक्ती मयत व ९३ जखमी झाल्याची नोंद आहे. तथापि गृहविभागाच्या अहवालानुसार सदर अपघात हे विविध कारणांमुळे झालेले असून सदर महामार्गावर काँक्रिटीकरणाच्या कामादरम्यान कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे झाले असल्याचे दिसून आलेले नाही.

कंत्राटदाराने कामाच्या ठिकाणी वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने काँक्रीट क्रॅश बॅरिअर, सेफ्टी रिबन इ. उपाययोजना केलेल्या असून संबंधित वाहतूक पोलीस विभागाशी समन्वय साधुन ट्राफीक वार्डनही तैनात केले आहेत.

(२) गृहविभागाच्या अहवालानुसार दि. ३ मे, २०२४ रोजी इनोव्हा गाडीला भीषण अपघात होऊन अनेक जण मृत व जखमी झाल्याबाबत महामार्ग पोलीस चिंचोटी हद्दीमधील पोलीस ठाण्याच्या अभिलेख्यामध्ये नोंद नाही. या व्यतिरिक्त भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या इंसीडंट मॅनेजमेन्ट कडूनही अशा कोणत्याही अपघाताची नोंद दिसून येत नाही.

(३) सदर महामार्गावरील अपघातांची प्रमुख कारणे ही ओवर स्पीडींग, वाहतूक नियम व संकेताचे पालन न करणे, बेकायदेशीर ओव्हर टेकींग इ. असल्याचे दिसून आले. महामार्ग सुरक्षा सुधारण्यासाठी व्हाइट टॉपिंग कामामध्ये रस्ते सुरक्षा ऑडीट यांचे शिफारशी नुसार विविध अपघात प्रवण ठिकाणांसाठी सुरक्षा उपाययोजना करण्यात येणार आहेत. या व्यतिरिक्त वाहतूक सुरक्षा व सुरळीततेच्या दृष्टीने सदर महामार्गाच्या १२१ किमी लांबीमध्ये ३ क्रेन, ३ पेट्रोलिंग वाहने व ३ रुग्णवाहीका तैनात केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोहली (ता.धानोरा,जि.गडचिरोली) येथील धान अवकाळी पावसाने भिजल्यामुळे झालेले नुकसान**

**(१४) * ७९४४६ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांगी, मोहली, सोडे, धानोरा, दूधमाळा, चातगाव, कारवाफा, सुरसूंडी, मुरमगाव (ता.धानोरा,जि.गडचिरोली) या संस्थांमध्ये आदिवासी विकास विभागाअंतर्गत खरीप हंगामात धानाची आवक वाढल्याने धान उघडयावर ठेवण्यात आले ते धान अवकाळी पावसाने भिजल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोहली येथील सेवा सहकारी संस्थेने २ लाख ११ हजार ८० क्विंटल धानाची खरेदी केली परंतु, गोदामाअभावी धानावर फक्त ताडपत्री टाकून ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धान अवकाळी पावसात भिजल्यामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपाययोजना करणेबाबत तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) धान पावसाने भिजलेला नसल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कुंभार्ली (ता.चिपळूण,जि.रत्नागिरी) घाटामधील रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत**

**(१५) * ७९४८७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथील गुहागर-चिपळूण-कराड या १३६ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाच्या कुंभार्ली घाटातील ७०/९०० ते ७४/६०० या रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामात खड्डे भरताना डांबर व मातीचा केलेला वापर, खडीकरण करताना ४० ऐवजी ६० एम.एम.च्या खडीचा करण्यात आलेला वापर, बीएम करताना डांबराचे कमी प्रमाण आणि कमी तापमानाचा डांबर वापरल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामावर संबंधित अधिकाऱ्यांची देखरेख व नियंत्रण नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत तसेच संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदरचे काम करारनाम्यातील तरतुदी व विनिर्दिष्ट मानकाप्रमाणे करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अन्न व औषध प्रशासनाकडून बनावट औषधांवर कारवाई करण्यात आल्याबाबत**

**(१६) * ८०१५२ श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कॅन्सर विरोधातील बनावट इंजेक्शन बाजारात आणल्या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने अनेक औषध कंपनींविरुध्द कारवाई केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेलंगणा येथील औषध कंपनीच्या तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासन विभागाने औषध कंपन्यांविरुध्दही कारवाई सुरु केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) मे. हेट्रो हेल्थकेअर लि. हैद्राबाद, तेलंगणा, या उत्पादकाचा CIZUMAB ४०० इंजेक्शन, समुह क्र. BB२३११A या औषधांचा बनावट असलेल्या साठयाची विक्री बाजारात होत असल्याची गोपनीय माहिती माहे जानेवारी, २०२४ च्या सुमारास प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने, बनावट औषधांचा अन्न व औषध प्रशासनाद्वारे शोध घेतला असता सदर औषधांच्या ०३ व्हाईल्स मे. लाईफक्युरा फार्मा, चेंबूर (पूर्व), मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्या असून त्यापैकी ०२ व्हाईल्स अनपौचारीकरित्या चाचणीसाठी शासकीय विश्लेषक, औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत. तसेच, ०१ व्हाईल ची तुलना उत्पादक यांच्या उत्पादना वेळी ठेवण्यात आलेल्या Control Sample सोबत केली असता मे. लाईफक्युरा फार्मा, चेंबूर (पूर्व), मुंबई यांच्याकडील उपलब्ध औषध बनावट असल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणी संबंधिताविरुद्ध औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० या अंतर्गत गोवंडी पोलिस स्टेशन, गोवंडी, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल (FIR) क्र.००६८, दि.१२.०३.२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. उपरोक्त बनावट औषध खरेदी विक्री करणाऱ्या मे.के डेक्कन हेल्थकेअर वाडीया कॉलेज जवळ, पुणे या पेढीचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तसेच, इतर संबंधित औषध विक्रेत्यांसंदर्भात कार्यवाही सुरू आहे.

या प्रकरणी पोलिसांसोबत पुढील तपास सुरू आहे. तपासणी अंती संबंधितांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० अंतर्गत मा. न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील खाजगी शाळांनी शैक्षणिक शुल्क वाढ केल्याबाबत**

**(१७) * ८००५९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत खाजगी शाळांनी १० ते १५ टक्क्यांनी शुल्क वाढ केल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा शुल्क सुधारणा कायद्यातील तरतूदी परिपूर्ण नसून ७ वर्षांहून अधिक काळानंतरही यात कोणतीही सुधारणा न झाल्याने त्याचा आधार घेऊन खाजगी शाळांकडून दर २ वर्षांनी १५% शुल्क वाढ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी शाळांच्या शुल्कवाढ नियंत्रणाबाबत दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी सह सचिव, शालेय

शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली ९ जणांची समिती गठीत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समितीने ३ महिन्यांत अहवाल शासनास सादर करणे अपेक्षित असतानाही ३ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही समितीचा अहवाल अद्याप सादर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शुल्क वाढ थांबविणे व त्याअनुषंगाने कायद्यात बदल करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा अधिनियम), २०१८ अन्वये राज्यातील खाजगी व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षक-पालक यांच्या मान्यतेने शैक्षणिक शुल्कामध्ये दर दोन वर्षानी वाढ करण्याबाबत तरतूद आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने अधिनियमातील व नियमांतील तरतुदींचा आढावा घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१८) * ७९८७४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणावर दहा वर्षांत सहा हजार कोटी रुपये तसेच दुरुस्तीच्या कामांवर १९२ कोटी रुपये खर्च होऊनही अद्याप या रस्त्याचे काम पूर्ण झाले नसून भविष्यात त्यावर आणखी खर्च वाढण्याची शक्यता असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गाच्या ४७१ कि.मी. पट्टयांपैकी ८४.६ कि.मी. रस्त्याची जबाबदारी ही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची असून उर्वरित रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असून सन २०१३ पासून नवीन रस्त्यांवर १,७७९ कोटी ८५ लाख ५७ हजार आणि दुरुस्तीच्या कामावर १४५ कोटी ८२ लाख रुपये खर्च झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एक दशकाहून अधिक काळ बांधकाम सुरु असलेल्या या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे केवळ ६७ टक्के काम पूर्ण झाले असून या महामार्गावर सन २०१० पासून २५०० पेक्षा अधिक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दिर्घकालीन चालणाऱ्या ह्या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामांची श्वेतपत्रिका काढून हा महामार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत तसेच या महामार्गावरील अपघातग्रस्तांना तातडीची आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(अ) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग दरम्यान पनवेल ते इंदापूर (किमी ०/०० ते किमी ८४/६००) ही लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. सदर लांबीचे काम बी. ओ. टी. तत्वावर सवलतदारास देण्यात आले होते. विहित मुदतीत काम पूर्ण न करु शकल्यामुळे सन २०२१ मध्ये सवलतदारासोबतचा करार संपुष्टात आणण्यात

आला. सन २०१६ ते सन २०२३ या कालावधीमध्ये रस्त्याच्या दुरुस्तीवर सवलतदाराच्या जोखीमेवर रु.१४५.८२ कोटी एवढा खर्च करण्यात आला आहे. तद्नंतर या लांबीमध्ये नवीन कंत्राटदार नेमून काम हाती घेण्यात आले व या कामावर एकूण रु. ४८३.२६ एवढ्या मंजुर रक्कमेपैकी आजपावेतो रु. २३१.६३ कोटी खर्च करण्यात आलेला आहे. या लांबीतील कामाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कंत्राटदारांची असून सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे.

(ब) इंदापूर ते झाराप (किमी ८४/६०० ते किमी ४५०/१७० ही लांबी राष्ट्रीय महामार्ग विभाग यांचे अखत्यारीत आहे. या लांबी साठी रु. ६१००.४४ कोटी एवढ्या मंजूर रक्कमेपैकी अद्यापपावेतो रु. ३५८०.३३ कोटी एवढा खर्च झालेला आहे. या कामांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी कंत्राटदारांची असल्याने त्यावर शासनाने कोणताही खर्च केलेला नाही. सद्य:स्थितीत या लांबीमध्ये काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई गोवा महामार्गाच्या कामांवर संपूर्ण लांबीसाठी आजपावेतो एकूण रु.३८११.९६ कोटी एवढा खर्च झालेला असून पनवेल ते इंदापूर या ८४.६० किमी लांबीमधील दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी सन २०१६ ते २०२३ या कालावधीमध्ये सवलतदाराच्या जोखीमेवर रु. १४५.८२ कोटी एवढा खर्च करण्यात आलेला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

पनवेल ते इंदापूर या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडील लांबीमध्ये सुमारे ८३ टक्के काम पुर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. या लांबीमध्ये सन २०१२ पासून ३४४ व्यक्तीचा अपघाती मृत्यू झालेला आहे. तसेच इंदापूर ते झाराप या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडील लांबीमध्ये सुमारे ८५ % काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. या लांबीमध्ये सन २०१३ पासून १५३२ व्यक्तींचा अपघाती मृत्यू झालेला आहे.

(४) महामार्गाचे काम जलदगतीने पूर्ण होण्यासाठी वरिष्ठ स्तरावर वारंवार बैठका घेण्यात येऊन आवश्यकतेनुसार पर्यायी कंत्राटदार नेमण्यात आले आहेत व कामे प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे, महर्षीनगर येथील सिटी इंटरनॅशनल स्कुलने ‘आरटीई’ अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांवर दबाव आणल्याबाबत

**(१९) * ७९५१३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, महर्षीनगर येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलने 'आरटीई' अंतर्गत प्रवेश घेतलेल्या इयत्ता पाचवीतील दहा ते बारा मुलांना अनुत्तीर्ण करून शाळा सोडल्याचा दाखला स्वीकारण्यासाठी पालकांवर दबाव आणत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने या प्रकरणी उप प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दोन पर्यवेक्षक आणि आठ शिक्षकांची चौकशी समिती गठीत केली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्याच इयत्तेत बसविण्यासाठी शाळा व्यवस्थापनाने ७० हजार रुपये फी भरा अन्यथा दुसऱ्या शाळेत प्रवेश घ्या अशा प्रकारचा दबाव आणल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी विभागीय सहाय्यक प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका स्तरावरून चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार इयत्ता पाचवीतील ३६ विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्याचे निदर्शनास आले होते. शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका कार्यालयाच्या दि.२४ मे,२०२४ रोजीच्या पत्रान्वये शाळेने माहे मार्च मध्ये घेतलेल्या परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांना पूरक मार्गदर्शन करण्यासाठी उपचारात्मक वर्ग सुरू करून माहे जून, २०२४ मधील शैक्षणीक वर्ष सुरू होण्यापूर्वी फेर परीक्षा घेऊन निकाल जाहीर करण्याबाबत आदेशित केले होते.फेर परीक्षेत इयत्ता पाचवीच्या एकूण ३२ विद्यार्थ्यांपैकी १५ विद्यार्थी उत्तीर्ण, ७ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले असून १० विद्यार्थी परीक्षेस अनुपस्थित होते. सदर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अनेक ठिकाणी दूषित पाण्यापासून बर्फ तयार करुन होत असलेली विक्री**

**(२०) * ७९८१९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: रायगड व पुणे (ता.पिंपरी-चिंचवड) तसेच पुणे शहरात दूषित जंतुयुक्त पाण्यापासून तयार करण्यात आलेल्या बर्फाची विक्री होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याच्या कडेला असलेल्या रसवंतीगृह, ज्युस सेंटर, लिंबु सरबताच्या हातगाडया तसेच टपऱ्यांमधील शितपेयांमध्ये सदर दूषित पाण्याच्या बर्फाचा वापर होत असतांनाही त्याकडे संबंधित शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दूषित बर्फामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दूषित बर्फाचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकांवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) दि.२४.०४.२०२४ रोजी 'नवशक्ती महाराष्ट्र' या स्थानिक वृत्तपत्रामध्ये रायगड व पुणे (ता.पिंपरी-चिंचवड) तसेच पुणे शहरामध्ये दूषित जंतुयुक्त पाण्यापासून तयार करण्यात येत असलेल्या बर्फाची विक्री होत असल्याबाबतची बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यानुषंगाने, दि.२४.०४.२०२४ रोजी अन्न व औषध प्रशासन, रायगड कार्यालयाने एका बर्फ उत्पादक अन्न आस्थापनेची तपासणी करुन खादयबर्फ (Edible Ice Cube) या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेतला आहे. सदर नमुना अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई येथे विश्लेषणासाठी पाठविण्यात आला असून सदरचा विश्लेषण अहवाल प्रतिक्षाधीन आहे. सदर विश्लेषण अहवाल प्राप्त होताच अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.
(२) व (३) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासन, रायगड कार्यालयाने दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.०५.२०२४ या कालावधीत एकूण ३ रसवंतीगृहांची व १ खाद्यबर्फ वाहतूकदाराची तपासणी केली आहे. त्यापैकी एका रसवंतीगृहातून खाद्यबर्फ (Edible Ice Cube) या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेतला आहे. सदर नमुना विश्लेषणास्तव अन्न विश्लेषक, म्युनिसिपल लॅबोरेटरी, दादर पश्चिम, मुंबई येथे पाठविण्यात आला असून सदरचा विश्लेषण अहवाल प्रतिक्षाधीन आहे. सदर विश्लेषण अहवाल प्राप्त होताच अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत नियमोचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच उर्वरित आस्थापनांच्या तपासणी अहवालांच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ अंतर्गत नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, अन्न व औषध प्रशासन, पुणे कार्यालयाने दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.०५.२०२४ या कालावधीत रसवंतीगृह, ज्युस सेंटर, लिंबू सरबताच्या हातगाड्या यांच्या एकूण ८ तपासण्या करण्यात आल्या असून एकूण ०२ बर्फाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेवून २९८.५ किलो (किंमत रु.८९५.५०) बर्फाचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आला आहे. सदर दोन अन्न नमुन्यांपैकी १ अन्न नमुना असुरक्षित घोषित करण्यात आला असून १ अन्न नमुन्याचा विश्लेषण अहवाल प्रलंबित आहे. असुरक्षित अन्न नमुन्याप्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) अन्न व औषध प्रशासनामार्फत खाद्यबर्फ उत्पादक, विक्रेते तसेच रसवंती गृह इत्यादी आस्थापनांची नियमितपणे तपासणी करण्यात येते व कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन आढळून आलेल्या प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ कायद्यानुसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत व्यापारी व हमाल यांच्यातील वादामुळे व्यापार बंद असल्याबाबत

**(२१) * ७९४६५ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत व्यापारी, हमाल व माथाडी यांच्यातील वादामुळे माहे मार्च-एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान बाजार समितीत व्यापार बंदीमुळे कृषी मालाची खरेदी-विक्री थांबली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे नुकसान होऊन त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासंदर्भात व्यापारी व हमाल यांच्यात वेळीच तोडगा काढण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, प्रशासनाने आवश्यकता असल्यास परवाने रद्द करणे वा अन्य दंडात्मक कारवाई करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासंदर्भात व्यापारी व हमाल यांच्यात तोडगा काढण्यासाठी व बाजार समित्यांमधील शेतमाल लिलाव सुरु करणेसाठी जिल्हाधिकारी, नाशिक, कामगार उपआयुक्त,नाशिक व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक या कार्यालयांनी नाशिक जिल्हा व्यापारी असोसिएशन प्रतिनिधी व हमाल/मापारी प्रतिनिधी यांच्यासमवेत एकूण ०४ संयुक्त बैठका घेतलेल्या आहेत.

(४) नाशिक जिल्ह्यातील एकूण १६ बाजार समित्यांपैकी ०७ बाजार समित्यांमध्ये हमाली/तोलाई रक्कम कपात न करता शेतमाल लिलाव कामकाज सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच व्यापारी/आडते यांचे परवाने रद्द करण्याचे अधिकार संबंधित बाजार समितीस आहेत. परंतु प्रस्तुत प्रकरणी बाजार समितीचे पातळीवर तोडगा निघून दैनंदिन शेतमाल लिलावाचे कामकाज सुरु झाल्याने पुढील कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विरार-अलिबाग कॉरिडॉर व पुणे रिंग रोडच्या कामाकरिता पूर्णत: भूसंपादन झाले नसतानाही काढलेल्या निविदांबाबत

**(२२) * ७९८७९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विनोद निकोले (डहाणू), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार-अलिबाग कॉरिडॉरसाठी लागणाऱ्या जमिनीपैकी पाच टक्के, तर पुणे रिंग रोडचे ५० टक्केच भूसंपादन झाले असतानाही रस्ते विकास महामंडळाने विरार-अलिबाग कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्यातील नवघर ते चिरनेर या ९६ कि.मी. लांबी मार्गाच्या अकरा पॅकेजच्या उभारणीसाठी १९ हजार ३३४ कोटी रुपयांच्या निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणतेही रस्ते, पूल, रोप-वे यांचे बांधकाम भूसंपादन पूर्ण होऊन सातबारा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावे झाल्याशिवाय काम सुरु केल्यास, संबंधित अधिकाऱ्यांना कोणतीही चौकशी न करता निलंबित करण्यात येईल अथवा शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असे नमूद असतानाही या निर्णयाचे पालन केले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सन २०१९ च्या शासन निर्णयाचे उल्लंघन करुन भूसंपादन पूर्ण झाले नसतानाही कंत्राटदारांशी संगनमत करुन कोट्यवधी रुपयांच्या निविदा काढणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खाक्षेस-२०२३/प्र.क्र.४४८/रस्ते-८, दि. ३०.११.२०२३ च्या पत्रान्वये निविदा काढण्यास परवानगी देण्यात आलेली असून त्यानुसार RFP निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदारास स्विकृती पत्र देण्यापूर्वी ७०% भूसंपादन झाले असणे आवश्यक आहे. त्यानुसार RFP निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे व त्यासोबतच भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२३) * ७९८२२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये करोडो रूपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या समितीच्या संचालक व सदस्यांवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाजार समितीच्या व्यवस्थापन समितीने सन २०१०-११ पासून केलेल्या गैरकारभारामुळे समितीचे कोटयवधींचे नुकसान झाल्याचे चौकशी अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाजार समितीचे संचालक व सदस्यांनी समितीचा निधी बुडीत असलेल्या कर्नाळा सहकारी बँकेमध्ये जमा केल्यामुळे बाजार समितीचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या झालेल्या नुकसानीची रक्कम वसुल करण्यासाठी तसेच गैरव्यवहार करणाऱ्या समितीच्या संचालक व सदस्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचेकडील दि.२५.०७.२०२३ रोजीच्या चौकशी अहवालास अनुसरुन, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४३ नुसार दि.२१.०५.२०२४ रोजी बाजार समितीचे सभापती/उपसभापती/सचिव व समिती सदस्यांना नोटीस बजावली असून सुनावणीची पुढील तारीख दि.२६.०६.२०२४ आहे. सुनावणी अंती कायद्यातील तरतुदीनुसार पुढील योग्य ती उचित कारवाई केली जात आहे.

तसेच बाजार समितीतील आर्थिक नुकसानीबाबत पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन समिती सदस्य यांच्या विरुध्द मा.न्यायालयात दावा लावणे करीता जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांनी त्यांचेकडील दि.२५.०७.२०२३ रोजीचे पत्रान्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल यांना प्राधिकृत केले आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल यांनी शासकीय अभियोक्ता रायगड यांचेशी संपर्क साधुन दिवाणी न्यायालय, पनवेल येथे दावा दाखल करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई येथील कांदिवली (पश्चिम) गांधीनगर परिसरातील दुकान क्र.२८ 'ग' मध्ये लाखो रुपयांच्या गहू-तांदुळाचा अपहार केल्याबाबत**

**(२४) * ७९४७१ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कांदिवली (पश्चिम) गांधीनगर परिसरातील दुकान क्र.२८ 'ग' मध्ये लाखो रुपयांच्या गहू-तांदुळाचा अपहार केल्या प्रकरणी शिधावाटप अधिकाऱ्यांनी दिनांक २२ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय ,हे खरे आहे.
(२) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. २८ ग, ६४, २८ ग १०७ व २८ ग ८० या दुकानांच्या तपासणी अनुषंगाने आढळून आलेल्या अपहारा अंती निलंबनाची कार्यवाही करून त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील औषध उत्पादक आणि वितरकांकडून औषधे, सौंदर्यप्रसाधने विषयक कायद्याचे उल्लंघन करण्यात येत असल्याबाबत

**(२५) * ७९९०१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औषध उत्पादक आणि वितरकांकडून औषधे, सौंदर्यप्रसाधने विषयक कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी ८९२ किरकोळ व १०३३ घाऊक विक्रेत्यांवर कारवाई करुन २.८५ कोटी रुपयांचा औषधांचा साठा जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील अनेक ठिकाणी औषधे व सौंदर्यप्रसाधनांच्या खोटया व प्रलोभन देणाऱ्या जाहिराती आणि विक्री करण्यात येत असून त्यांच्यावर कारवाई करण्यास प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनाने औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ नुसार सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात औषधे उत्पादक व विक्रेत्यांच्या करण्यात आलेल्या नियमित तपासण्याअंतर्गत आढळून आलेल्या नियमांच्या उल्लंघनासाठी किरकोळ व घाऊक विक्रेते अशा एकूण २८६२ पेढींना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यापैकी एकूण २११८ पेढींवर परवाने निलंबनाची कारवाई करण्यात आली असून एकूण ४१५ पेढीवर परवाना रद्दची कारवाई करण्यात आली आहे. तसेच, सदर आर्थिक वर्षात विना परवाना व बनावट औषध विक्री प्रकरणात एकूण रु. ५.७८/- कोटी किंमतीचा औषध साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.